

# वैवाहिक सुखासाठी वास्तुशास्त्र

मूलतः वास्तुदोष व मानवी मनातील अंहकार या दोनच गोष्टी पतीपत्नी अथवा कौटुंबिक सदस्यांमधील संघर्षाला कारणीभूत आहेत. अहंकार हा प्रत्येक व्यक्तीमध्ये कमी अधिक प्रमाणात असतोच आणि याच अहंकाररुपी आगीत जेव्हा वास्तुदोषांचे तेल पडते तेव्हा त्या अहंकाररुपी अग्नीचा भडका उडतो व क्षणात शांतस्वभावी व्यक्ती प्रक्षोभक बनते किंवा प्रक्षोभक अधिकाधिक प्रक्षोभक होत जाते व कुटुंबाची शांतता, सौहार्दता भस्मसात करते.

काही वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेला हिंदी चित्रपट स्वर्गनरक म्हणजे वैवाहिक जीवनाचं विश्लेषण करणारी उत्कृष्ट कलाकृती. यातील दोन कुटुंबामध्ये दाखविलेला विरोधाभास म्हणजेच वैवाहिक जीवनाचे दोन मुख्य पैलू जे तुमच्या घराला स्वर्ग अथवा नरक बनवू शकतात. अत्यंत मनोरंजक पण हृदयस्पर्शी असा तो चित्रपट होता. ज्याद्वारे सुखी वैवाहिक जीवनाचा फॉर्म्युलाच जणू जनतेला दिला होता. परंतु तो फॉर्म्युला सर्वच प्रेक्षकांनी आत्मसात केला असता तर आज आपणास लाखोकरोडो घरांमधील संघर्ष संपुष्टात आलेले दिसले असते व जास्तीत जास्त किंवा सर्वच परिवार गुण्यागोविंदाने, आनंदाने रहाताना पहायला मिळाले असते. परंतु मूलतः तसे घडलेले दिसत नाही. प्रेक्षक त्या चित्रपटाला एक मनोरंजनाचं साधन म्हणून पाहत असल्याने चित्रपटगृहातून बाहेर पडताना त्यातील विचार तिथेच सोडून आले.

### बदलती कुटुंबपद्धती

एकत्र कुटुंबपध्दती जवळजवळ नामशेष होऊन विभक्त कुटुंबपध्दत समाजात फारच मोठ्या प्रमाणावर स्थिरावली आहे. एकत्र कुटुंब पध्दती मधील वैयक्तिक व्यक्तीमत्व विकासाचा दोष पूर्णपणे दूर होऊन विभक्त पध्दतीत तो पूर्णपणे विकसित होईल, अशी अपेक्षा होती. परंतु वैयक्तिक व्यक्तीमत्व विकासासोबत अंहकार, व्यक्तीस्वातंत्र्य व स्वैराचार या गोष्टींना मुक्त वातावरण मिळाल्याने, छोटे कुटुंब सुखी कुटुंब ही उक्ती पूर्णतः खरी ठरण्याऐवजी फार मोठ्या प्रमाणावर अयशस्वी होत असल्याचे दिसून येत आहे. वैयक्तिक हेवेदावे, अंहकार, समानता व महत्वाकांक्षा यामुळे पतीपत्नीमधील नाते भावनिक व प्रेमळ रहाण्यापेक्षा जास्तीत जास्त व्यवहार पाळणारे होत चालल्याचे चित्र फार मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. एक गोष्ट मात्र अगदी प्रत्येक कुटुंबात प्रकर्षाने जाणवत आहे ती म्हणजे सहमतीपेक्षा मतभेदांचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणावर वाढत चालले आहे व कौटुंबिक सौहार्दाचे प्रमाण कमी कमी होत चालल्याचे सर्वत्र दिसत आहे.

### वास्तुदोष व कुटुंबजीवन

कुटुंबातील शांतता व सौहार्दपूर्ण वातावरण माणसाला यशाच्या शिखरावर नेऊ शकते किंवा अपयशाच्या दरीत लोटू शकते. सुखी व सौहार्दपूर्ण वातावरणामुळे मनुष्याला घर स्वर्गासारखे वाटू लागते. पूर्णपणे शारीरिक व मानसिक स्वास्थ मिळाल्याने व्यक्तीमधील कलागुणांना पोषक वातावरण व संधी यांना वाव मिळतो व त्यातून उत्तम कार्याअनुभवाचे प्रत्यंतर पहावयास मिळते. पण जर का घरातून ऑफिसला बाहेर पडताना गरमागरमी झाली, खटके उडाले, मानवी अहंकाराला अथवा आत्मसन्मानाला ठेच पोहचली की त्याचा परिणाम संपूर्ण दिवसभर तुमच्या कार्यक्षमतेनुसार होतो व परिणामी तुमच्या कार्याचा दर्जा घसरतो. साध्या साध्या गोष्टींमध्ये सुध्दा चुका होतात. कामकाजात दोष परिणामी अपमान, अवहेलना व अवमूल्यन अथवा अधःपतन घडते व बुडत्याचा पाय अधिकच खोलात जाऊ लागतो. कार्यक्षेत्रात असमाधान व त्याचे पडसाद घरात संताप, आदळआपट व आरडाओरड या स्वरुपात उमटतात व संसाराची गाडी उलट्या दिशेनेच जात रहाते. आपलीच माणसं नकोशी

## शयनगृहासाठी काही सूचना

- घरातील पती-पत्नीचे मुख्य शयनगृह नैऋत्य दिशेलाच असावे.
- झोपताना डोके दक्षिणेस व पाय उत्तरेस येतील अशीच पलंगाची रचना असावी.
- शयनगृहामधील ड्रेसिंग टेबल व इतर आरशांची रचना अशी असावी की झोपणाऱ्यांची प्रतिमा आरशात दिसणार नाही.
- शयनगृहातील भिंतींना हलका गुलाबी रंग असावा तसेच दरवाज्याला पडदेदेखील शक्यतो गुलाबी रंगाचेच असावे.
- शयनगृहात दोन वेगवेगळे पलंग एकमेकांना जोडले असतील, त्यावरच्या गाद्यादेखील वेगवेगळ्या असतील तर दोन्ही गाद्यांवर एकच मोठी चादर असावी.
- शयनगृहात कोठलाही फोटो किंवा ........ ........ किंवा वस्तू तीन नसतील याची काळजी घ्यावी. सजावटीसाठी वापरण्यात येणाऱ्या इतर वस्तूही जोडीने असाव्या. बाहुली असेल तर बाहुला जरुर ठेवावा, राधा व कृष्ण जोडीने ठेवावे. शिव व पार्वती याच्या प्रतिमा जोडीने ठेवणे शुभ असते.
- कबूतर, लव्ह बर्डस् ह्यांच्या जोड्या शयनगृहात लावल्याने पती-पत्नी यांचे परस्परांवरील प्रेम द्विगुणित होते.
- फुलदाणीतील दोन गुलाब सुखद अनुभूती देतात.
- नवीन लग्न झालेल्या पती-पत्नीच्या शयनगृहात बाळकृष्णाची प्रतिमा लावणे फायद्याचे ठरते.
- पती-पत्नीच्या शयनगृहासाठी वरील सूचनांचे पालन केल्यास त्या पती-पत्नीमध्ये सामंजस्य, प्रेम व सौख्य दिर्घकाळ टिकते.

वाटतात व कुटुंबाची वाताहत होण्यास वेळ लागत नाही.

त्यापेक्षा गोड प्रेमळ सुसंवाद, एकमेकाला सहयोग, सहकार्य, दोन गोड शब्द व एक सुंदर हास्य तुमच्या घराचा कायापालट करून स्वर्गमय वातावरण निर्माण करु शकते. सर्व माणसं सारखीच असतात, त्यांची घरं एक सारखीच असतात, तर मग अशा असमान घटना विविध घरात का घडतात. वास्तुशास्त्रीय दृष्ट्या परस्पर सौहार्दपूर्ण संबंधावर तुमच्या गृहरचनेचा प्रभाव फार मोठ्या प्रमाणावर आहे.

मूलतः वास्तुदोष व मानवी मनातील अंहकार या दोनच गोष्टी पतीपत्नी अथवा कौटुंबिक सदस्यांमधील संघर्षाला कारणीभूत आहेत. अहंकार हा प्रत्येक व्यक्तीमध्ये कमी अधिक प्रमाणात असतोच आणि याच अहंकाररुपी आगीत जेव्हा वास्तुदोषांचे तेल पडते तेव्हा त्या अहंकाररुपी अग्नीचा भडका उडतो व क्षणात शांतस्वभावी व्यक्ती प्रक्षोभक बनते किंवा प्रक्षोभक अधिकाधिक प्रक्षोभक होत जाते व कुटुंबाची शांतता व सौहार्दता भस्मसात करते. त्यामुळे सर्वप्रथम पतीपत्नीची मानसिकता प्रगल्भ, परिपक्व व प्रौढ स्वरुपाची करणे अत्यावश्यक असते. म्हणजेच सहजासहजी कुठल्याही गोष्टींमुळे मन अथवा विचारधारा विचलीत होणार नाही अशी मानसिकता तयार करणे आणि हे सर्व जर का त्यांचे मुख्य शयनगृह (मास्टर बेडरुम) नैऋत्य (दक्षिण व पश्चिम यांच्यामधील) दिशेला असेल तर सहज शक्य होते. मूलतः नैऋत्य दिशेचे शयनगृह गृहस्वामी व स्वामिनीला शारिरीक, मानसिक व



**वास्तुशास्त्रविशेष**

आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देण्यात फार महत्वाची भूमिका पार पाडते. जर का मन स्वस्थ व शरीर तंदुरुस्त असेल तर क्षुल्लक कारणांमुळे मानसिक तोल कधीही जात नाही व आपआपसातील समन्वय चांगला व सौहार्दपूर्ण होतो. म्हणजेच कमीत कमी राग व अधिकाधिक शांतता लाभते.

याव्यतिरीक्त दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे तुमच्या घराची वायव्य (उत्तर व पश्चिम यांचा मध्य) दिशा वास्तुदोष विरहित असावी म्हणजेच शास्त्राप्रमाणे मान्य असे शौचालय, पाहुण्यांसाठी शयनगृह, भोजनगृह (डायनिंग हॉल) अभ्यासिका, भांडारगृह, पार्कींग आदि सोयी सुविधा असणे योग्य ठरते. परंतु जर का वायव्य दिशेस स्वयंपाकगृह अथवा मुख्य शयनगृह असेल तर त्या पतीपत्नीमध्ये खटके उडण्याचे प्रमाण फारच मोठ्या प्रमाणावर असते. अशा वास्तू म्हणजे भांडणे, अशांतता व असमन्वय यांचे माहेरघरच असते व एकंदरीत त्या कुटुंबाची अधोगतीकडे वाटचाल होत असते.

वायव्य दिशेचा वास्तुदोष तुमच्या परिवाराला इतरांकडून होणाऱ्या मत्सरघाताचा शिकार करीत असतो. मत्सरघाताचा दुष्परिणाम हा प्रदीर्घ कालावधीनंतर जाणवत असतो, कारण एका विशिष्ट मर्यादेपर्यंत तुमच्यात मत्सर, घात सहन करण्याची शक्ती असते. परंतु त्यापलिकडे तुम्हाला मत्सर घातामुळे आजारपण, मानसिक अस्वस्थता व प्रगतीत अडथळे अशा प्रकारचे त्रास होऊ लागतात. त्यामुळे वायव्य दिशा दोषमुक्त असणे आवश्यक आहे. अन्यथा वास्तुदोष निवारक उपायांच्या माध्यमातून या वास्तुदोषांची तीव्रता कमी करणे अत्यावश्यक आहे.

सुखी, आनंदी व यशस्वी वैवाहिक जीवनासाठी तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे आपल्या वास्तुमधील वातावरण लहरी प्रसन्न व आनंददायी होतील अशा प्रकारची वातावरण निर्मिती करणे. प्रसन्न वातावरण म्हणजे प्रसन्न मन म्हणजेच चांगला समन्वय, पर्यायाने चांगले वैवाहिक जीवन.

### वास्तूदोष निवारणासाठी

वास्तुमधील वातावरण लहरींमध्ये प्रसन्नता आणण्यासाठी एक तर घराचा पूर्व व उत्तर भाग मोकळा व हलका असावा. सकाळची कोवळी सुर्यकिरणे जास्तीत जास्त घरात येतील असे करावे. घरात कमीत कमी अडगळ अथवा अनावश्यक सामान नसावे. घरास चांगला रंग, नीटनेटकी रचना पूजा-अर्चा, मंगलमय स्तोत्र अथवा श्लोकांच्या माध्यमातून भक्ती व मंगलमय लहरी घरात जास्त निर्माण होतील असा प्रयत्न सातत्याने करीत रहावा. मंगलमय वातावरणामुळे वास्तुमधील दोष दूर होतात तर भक्तिमार्गामुळे मानवी मनातील अहंकाररुपी दुर्गुण कमी होता व त्यामुळे वास्तुदोष निर्मित व अंहकार निर्मित दोषांमुळे निर्माण होणार तणाव कायमचा नष्ट हो[ता] व त्या कुटुंबामध्ये प्रेममय वातावरण अनुभव[ास] मिळते. तुम्हीसुध्दा करून पहा नक्कीच आन[ंद] मिळेल.

या व्यतिरिक्त आणखी एक प्रकार[चा] वास्तुदोष काही घरांमध्ये आढळतो जो म[त] माझ्या अभ्यासानुसार फारच गंभीर स्वरुपा[चा] वाटतो. तो म्हणजे दक्षिण व नैऋत्य भाग[ात] बाथरुम व शौचालय त्याच भागात कट आ[णि] सांडपाण्याचे पाईप डक्टच्या (Duct) स्वरुप[ात] असतील. अशा प्रकारच्या वास्तुमधील बहुत[ां]शी संसार पूर्णपणे उध्वस्त झालेले आहेत क्वचि[त] ठिकाणी कुठली तरी पुण्याई व काही ठिका[णी] योग्य त्या वास्तुदोष निरुपण उपाय केल्यानु[ळे] अनर्थ टाळता आले आहेत.

एकंदरीत यशस्वी वैवाहिक कौटुंबि[क] जीवनावर वास्तुशास्त्राचा फार मोठा प्रभाव आ[हे] त्यामुळे जरी वास्तुलाभ प्रारब्ध योगानुसार ह[ो] असला तरी वास्तू घडविणे अथवा बिघडवि[णे] आपल्या हातात म्हणजेच वास्तुशास्त्रात अ[...] व त्यानुसार सुखशांती, समृध्दी व संपूर्ण आर[ोग्य] प्राप्त करणे आपल्याला वास्तुशास्त्र माध्यमा[तून] सहज शक्य आहे.


*With Best Compliments*

**C.P. THAKKAR & COMPANY (PHARMA) LTD.**



Off (☎) : 208 7696
: 208 0715
Fax : 208 0297
Gram : VIBRONA

E-mail : cpt@bom3.vsnl.net.in

89, PRINCESS STREET,
PEERBHOY BLDG. 1ST FLOOR,
MUMBAI- 400 002.


## मतप्रवाह

**दैनंदिन समाजजीवनात घडणाऱ्या विवि[ध] बऱ्या- वाईट घटना पाहून, ऐकून आप[ण] अस्वस्थ होतो. अंतर्मुख होऊन विचार करायल[ा] लागतो आणि मग त्या घटनांबद्दल आपल्याल[ा] काहीतरी लिहावंस वाटणं स्वाभाविक आहे. अ[शा] स्वाभाविकपणातून आपल्याला जे लिहावं वाटतं ते लिहून 'जनप्रवाह'कडे जरुर पाठव[ा] आपल्या या स्वाभाविक लेखनास 'मतप्रवा[ह]' या सदरातून प्रसिध्दी दिली जाईल. 'मतप्रवा[ह]' या सदरासाठी आपले लेखन प्रवाही विचारप्रवर्तक लेख या स्वरुपाचे असा[वे]. 'मतप्रवाह'साठी विषयाचे बंधन ना[ही]. लेखासोबत लेखकाने पूर्ण नाव, पत्ता, व्यवसा[य] इत्यादीसह पासपोर्ट आकाराचे छायाचि[त्र] पाठवावे. निवडक 'मतप्रवाहां'[ना] 'जनप्रवाह'मधून प्रसिध्दी दिली जाईल. याबा[बत] स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.**


**साहित्य पाठविण्यासाठी पत्ता**
**संपादक, जनप्रवाह.** २०४, सुरंगा को.ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट नं.२४१, सेक्टर चारकोप, कांदिवली (प), मुंबई - ६७. फोन:८६७७७६१.